# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – १३ एप्रिल २०१६

## समाज जनजागृतीसाठी चित्रपट सशक्त माध्यम

### मुंबई विद्यापीठात २४ तासाचे फिल्म मॅरेथॉन

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त संज्ञापन व पत्रकारीता विभागाचा पुढाकार

मुंबई –चित्रपट हे समाजमनाचा आरसा असून सामाजिक जीवनाच्या स्थित्यंराचे ते वेध घेत असून आपल्या आजू-बाजूला होत असलेले बदल अचुकपणे टिपण्याचे सामर्थ्य चित्रपटामध्ये आहे, मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन व पत्रकारीता विभाग आणि फिल्म क्लबने आयोजित केलेल्या २४ तासाच्या फिल्म महोत्सवाच्या माध्यमातून ज्ञान,शिक्षण आणि जागृकता निर्माण होण्यासाठी हातभार लागणार असून समाज जनजागृतीसाठी चित्रपट सशक्त माध्यम असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त संज्ञापन व पत्रकारीता विभागाने पुढाकार घेऊन २४ तासाचे फिल्म मॅरेथॉनचे आयोजन केले आहे. आज पासून सुरु झालेल्या या फिल्म मॅरेथॉनचे उदघाटन मुंबईच्या महापौर स्नेहल आंबेकर आणि ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी केले. उदघाटन प्रसंगी बोलतांना मुंबईच्या महापौर स्नेहल आंबेकर म्हणाल्या की, समाजात चित्रपटांच्या माध्यमातून राष्ट्र पुरुषांचे विचारांचे आदान – प्रदान मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी व फिल्म मॅरेथॉन सारखे स्तूत्य उपक्रम हे महानगर पालिकेच्या माध्यमातून खुल्या जागेत भरविण्यासाठी पालिका सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे त्या म्हणाल्या की, भारतीय संविधानामुळेच आज महिला विविध क्षेत्रात वावरत असून संपन्न राष्ट्राच्या उभारणीमध्ये महिलांचे मोलाचे योगदान दिवंसेदिवस अधोरेखित होत असल्याचे त्यांनी सांगितले. तर महात्मा ज्योतिबा फुले आणि अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांचे समाजातील स्थान अधोरेखित करतांना ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर म्हणाले की, या दोन्ही राष्ट्रपुरुषांनी जातीअंताच्या लढ्यात सक्रीय सहभाग घेऊन समाजाला नवी दिशा दिली. गुलामीचे पाश तोडून आदर्शवत समाजाच्या निर्मितीमध्ये या समाजसुधारकांनी मोठे योगदान दिले आहे. या अशा अनेक राष्ट्रपुरुषांचे विचार चित्रपटांच्या माध्यमातून समाजमनापर्यंत पोहचविण्याचे कार्य या अशा माध्यमातून होणे हे स्तूत्य असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजाला भेडसावणा-या अनेक समस्यांचे चित्रण चित्रपटाच्या माध्यमातून होत असून अशा महोत्सवातून प्रदर्शित होणारे माहितीपट आणि चित्रपटातून समाजातील अनेक प्रश्नांना आणि समस्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन व्यापक होत असल्याचे मत विभागप्रमुख डॉ.सुंदर राजदीप यांनी व्यक्त केले.

मुंबई विद्यापीठात पहिल्यांदाच २४ तासाच्या फिल्म मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. एका पाठोपाठ एक सलग २४ तास, जगभरात गाजलेले विविध विषयांवरील ८ चित्रपट या फिल्म मॅरेथॉनमध्ये दाखवले जाणार आहेत. यामध्ये सुप्रसिध्द चित्रपट ‘लिंकन’ या चित्रपटाने या फिल्म मॅरेथॉनला सुरुवात झाली असून १४ एप्रिल ला ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर – द अनटोल्ड ट्रूथ’ या चित्रपटाने या फिल्म मॅरेथॉनची सांगता होणार आहे.

सलग २४ तास चालणाऱ्या या फिल्म मॅरेथॉन मध्ये अमेरिकेचे माजी अध्यक्ष अब्राहम लिंकन यांच्यावर आधारीत आणि सुप्रसिध्द दिग्दर्शक स्टीव्हन स्पीलबर्ग यांनी दिग्दर्शित केलेले ‘लिंकन’, शाम बेनेगल यांचा ‘नेताजी सुभाषचंद्र बोस’, वेद राही यांनी दिग्दर्शित केलेला ‘वीर सावरकर’, जेम्स मार्श यांचा ‘द थेअरी ऑफ एव्हरीथिंग’, ओम राऊत यांचा ‘लोकमान्य’, रिचर्ड एटनबर्ग यांचा गाजलेला ‘गांधी’ चित्रपट, केतन मेहता यांचा ‘सरदार’, वाल्टर सेल्स यांचा ‘मोटर सायकल डायरीज्’ आणि सुप्रसिध्द दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांचा ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर – द अनटोल्ड ट्रूथ’ हे आठ चित्रपट दाखवले जाणार आहेत.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )